# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**शोधप्रबंध आराखडा (Synopsis)**

मानव्य विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी साठी
सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

# ''१९९१ ते २०१९ या कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप : एक अभ्यास''


संशोधक

**प्रा.संजय काशिनाथ शेळके**

राज्यशास्त्र विभाग

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद

ता.मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक

**प्रा.डॉ.नवनाथ गोविंदराव अडकीने**

राज्यशास्त्र विभागप्रमुख

कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी जि.नांदेड


अभ्यास केंद्र

**पीपल्स कॉलेज, नांदेड**

**जुलै २०१९**

# ‘‘१९९१ ते २०१९ या कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप : एक अभ्यास’’

**प्रास्ताविक :**

भारतीय परराष्ट्र धोरणाची पायाभूत तत्त्वे ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीबरोबर विकसित होत गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय परराष्ट्र धोरणाची जी औपचारिक उद्दिष्टे ठरविण्यात आली त्याची बीजे स्वातंत्र्य चळवळीच्या कळताच पेरली गेली होती. परिणामी भारतीय परराष्ट्र धोरणाचा इतिहास तपासताना गेल्या शंभर वर्षामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात भारताने घेतलेल्या विविध निर्णयाचा आणि भूमिकेचा आढावा घ्यावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटिश परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. इंग्लंडमधील संसदीय लोकशाही राजनय (Diplomacy) प्रस्थापित करण्याची प्रशासकीय संरचना, उदारमतवादी विचार, लोकशाहीच्या संरक्षणाचे उद्दिष्ट, परराष्ट्र धोरण ठरविण्याची संस्थात्मक प्रक्रिया आदि गोष्टींचा भारताच्या जागतिक राजकारणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनावर निश्चितच परिणाम झाला. स्वातंत्र्यानंतर देखील यापैकी अनेक गोष्टी भारतात परराष्ट्र धोरणासाठी आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरले आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीच्या प्रक्रियेवर ब्रिटिश परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे सुरुवातीच्या काळात परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेमधील सहभागी होणारे प्रशासकीय अधिकारी हे ब्रिटिश परंपरेच्या पद्धतीतून तयार झालेले होते. त्यांना मिळालेले प्रशिक्षण हे ब्रिटिश परंपरेचे होते. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पं.जवाहरलाल नेहरु यांच्या विचारांचादेखील ब्रिटिश उदारमतवादी परंपरेचा जबरदस्त प्रभाव होतात.

रवींद्रनाथ टागोर यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची एक व्यापार आणि उदार दृष्टी उपलब्ध करून दिली. ‘वसुधैव कुटुंबकम्’ आणि ‘शांततामय सहजीवन’ ही भारतीय संस्कृतीची दोन प्रमुख वैशिष्टे आणि गांधीवाद, अध्यात्मकवाद आणि आंतरराष्ट्रीय वाद, नेहरुंचा लोकशाही समाजवाद याच विचारसरणीमधून विकसित झालेला होता. या

समाजवादावर महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि अरविंद घोषांच्या विचारांची स्पष्ट छाप जाणवते. नेहरुंच्या लोकशाहीत समाजवाद हा केवळ भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची साधनाच बनला आहे. तर भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक सैद्धांतिक चौकट समाजवादाने पुरविली आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात नेहरुंचा समाजवाद हा दोन प्रमुख तत्त्वावर आधारलेला होता.

अ) निर्णय स्वातंत्र्य (Independence of Judgement)

ब) आत्मनिर्भरता (Self Reliance)

या दोन प्रमुख तत्त्वांच्या आधारावर नेहरुंचे परराष्ट्र धोरण विकसित झाले. नेहरुंच्या अलिप्ततावादी धोरणात या तत्त्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. या समाजवादाचे स्वरूप आंतरराष्ट्रीय होते. यामध्ये केवळ भारताच्या विकासाचा विचार नव्हता तर आशिया-आफ्रिका खंडातील सर्वच गरीब, अविकसित आणि विकसनशील राष्ट्राच्या प्रगतीचा विचार अंर्तभूत होता. हा समाजवाद सामुहिक विकासाची कास धरणारा होता. या समाजवादाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आशिया,आफ्रिका खंडात चाललेल्या वसाहतविरोधी चळवळीशी जोडले. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही एक अलिप्त घटना नसून विसाव्या शतकात गतिमान बनलेल्या वसाहतवादविरोधी चळवळीचा एक भाग होता.

भारत १५ ऑगस्ट १९४७ ला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झाला. एक सर्वगुण राष्ट्र म्हणून भारताचा उदय झाला. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण ठरविणे त्याला क्रमप्राप्त ठरले. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून त्याचे परराष्ट्र धोरण ठरविताना जागतिक पातळीवर असलेल्या विकसित देशांचा भारतावर प्रभाव पडणे साहजिकच होते. सध्याच्या काळात विविध देशाच्या गरजा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्या पूर्ण करण्याचे सामर्थ्य कोणत्याही एका देशाकडे आज नाही. त्यामुळे जगातील विविध देशांची मदत घेतल्याशिवाय प्रत्येक देशाला पर्याय नाही. एका देशाने दुसऱ्या देशाशी प्रस्थापित केलेले संबंध म्हणजे परराष्ट्र धोरण होय. कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण ठरवत असताना अनेक उद्दिष्टांचा विचार केला जातो. हे धोरण भारताचे असो अथवा अमेरिकेचे. आपल्या शेजारी देशाबरोबर सहकारी, मैत्री, बंधुभाव निर्माण करणे अथवा शत्रुत्व निर्माण करणे हा परराष्ट्र

धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. परराष्ट्र धोरण ठरविण्याचा व अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. त्यात महत्त्वाची भूमिका पंतप्रधान व मंत्रिमंडळाची आहे. यात राष्ट्रीय सुरक्षा परिषद, परराष्ट्र मंत्रालय, गुप्तरच यंत्रणा यांचाही विचार केला जातो. भारताचे परराष्ट्र धोरण प्राचीन काळी, मध्ययुगीन काळी, ब्रिटिश कालखंडात कसे होते याचा आढावा घेतला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाची साधने, उद्दिष्टे व वैशिष्ट्ये तसेच परराष्ट्र धोरण ठरविताना केल्या जाणाऱ्या घटकांचा विचार यामध्ये करण्यात आला आहे. भारताने जागतिक राजकारणापेक्षा स्वतःचा विकास व आर्थिक प्रगती याला अधिक गांभीर्याने घेतले. यावेळी अमेरिकेने व इतर विकसित राष्ट्रांनी याची जबाबदारी स्वीकारली. मुक्त अर्थव्यवस्था किंवा भांडवलशाही अर्थरचना भारतानेही स्वीकारावी अशी आग्रही भूमिका घेण्यात आली.

१९९१ ते २०१९ या कालखंडात जागतिक पातळीवर बरीच स्थित्यंतरे झाली. त्याचा परिणाम भारतीय परराष्ट्र धोरणावर झाला. कारण १९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले. मार्क्सवादाचा एक प्रकारे पराभव झाला. रशियाचे पंधरा तुकडे पडून जगातील रशियाचे वर्चस्व संपुष्टात आले. जगाला पुन्हा एकदा अमेरिकेचेच प्रभुत्व मान्य करणे भाग पडले. एकमेव महासत्ता म्हणून अमेरिका उदयास आली. याचा परिणाम असा झाला की शीतयुद्ध महासत्तेचा प्रश्न व अमेरिकेसोबत बिघडलेले संबंध सुधारुन घेणे सक्तीचे ठरले. भारतालाही अमेरिकेचे प्रभुत्व मान्य करावे लागले. याचवेळी जगात जागतिकीकरणाची प्रक्रिया जोर धरू लागली. जगात सर्वत्र मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार होऊन गॅट करार अमलात आणला गेला. विशेष म्हणजे भारतानेही गॅट करारावर स्वाक्षरी करून आपणही यात सहभागी असल्याचे स्पष्ट केले. कारण रशियाच्या विघटनामुळे रशिया एक कमकुवत राष्ट्र बनले. भारताच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला. सन १९७१ मध्ये भारताच्या संरक्षणासाठी भारत व रशिया यांच्यात करार झाला. पण या करारासंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण होऊन भारताने अमेरिकेसोबतच मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करावेत असे ठरले. म्हणून भारताचे पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी अमेरिकेला भेट देऊन भारतातील

दहशतवाद हा अमेरिकेच्या मदतीने संपुष्टात आणण्यासाठीचे शर्थीचे प्रयत्न केले व त्यांच्या या प्रयत्नाला यशही आले.

त्यानंतर भारताच्या पंतप्रधानपदी अटलबिहारी वाजपेयी विराजमान झाले. वाजपेयी यांच्या कार्यकाळात भारत-अमेरिका संबंधाला बळकटी आली. पण ११ मे व १३ मे १९९८ मध्ये भारताने पोखरणच्या वाळवंटात पाच अणुस्फोट घडवून आणले. त्यामुळे अमेरिकेने नाराज होऊन भारतावर आर्थिक निर्बंध लादले. अमेरिकेच्या निर्णयाने भारत मुळीच डगमगला नाही. उलट भारताने आपली घौडदौड सुरूच ठेवली. शेवटी अमेरिकेला नमते घ्यावे लागले व भारतावरील निर्बंध उठवावे लागले. याचवेळी सन १९९८ मध्ये भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी अमेरिकेला भेट दिली. ही भेट अतिशय महत्त्वपूर्ण ठरली. उभय देशातील परराष्ट्र खात्यातील अधिकारी वर्ग या भेटीला अतिशय महत्त्व देतात.

यातून भारताचे परराष्ट्र धोरण वास्तविक ठरत गेले. १९९० नंतर भारताने युनोमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. भारताच्या सुरक्षा परिषदेतील कायम सदस्याच्या मागणीला बऱ्याच देशांचा पाठिंबा मिळत आहे. शीतयुद्धोत्तर काळानंतर भारताकडे पाहण्याचा जागतिक दृष्टिकोन बदललेला आहे. भारताने मानवी अधिकाराच्या दृष्टिकोनातून अतिरेक्यांविरोधात कठोर पावले उचललेली आहेत. त्यासंबंधी भारताचा मानवतावादी दृष्टिकोन आहे.

**विषयाची निवड**

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये शीतयुद्धोत्तर (१९९० नंतर) महत्त्वपूर्ण बदल घडून आले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेल्या नवीन आव्हानांचा एकीकडे सामना करण्यासाठी शीतयुद्धोत्तर काळात विकसित झालेल्या नवीन विश्वरचनेशी जुळवणूक करुन घेण्यासाठी परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये गुणात्मक परिवर्तन घडवून आणणे अपरिहार्य होते. आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे वास्तववादी दृष्टिकोनातून पाहण्याची एक नवी मानसिकता भारतीय धोरणामध्ये आकारास आली. या मानसिकतेचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणात दिसून येते. आंतरराष्ट्रीय

राजकारणात भारताला महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडता यावी, एक महासत्ता म्हणून उदय व्हावा, विकसनशील राष्ट्राचे नेतृत्व भारताला करता यावे ह्या उद्दिष्टांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

शीतयुद्धोत्तर काळात भारताचे द्विपक्षीय आणि बहुपक्षीय पातळीवरील इतर राष्ट्रासमवेतचे संबंध परराष्ट्र धोरणाप्रमाणेच विभागीय आणि आंतरराष्ट्रीय संघटना, व्यापार संघ यांच्या समवेत भारताच्या अणुचाचण्या अणुप्रभाव, दहशतवाद व दहशतवादविरोधी भारताची भूमिका, सर्जिकल स्ट्राईक हया अनुषंगाने हा विषय निवडला आहे.

**सामाजिक संशोधनाची उद्दिष्टे**

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पूर्व इतिहास तपासणे.

२) भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या यशापयशाचा अभ्यास करणे.

३) भारताच्या आण्विक धोरणाचा अभ्यास करणे.

४) दहशतवाद मुक्तीसाठी भारताने केलेले प्रयत्न अभ्यासणे

५) भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप अभ्यासणे.

६) भारताची जागतिक संघटनेतील भूमिका तपासणे.

**संशोधनाची गृहितके**

१) भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल झाला आहे.

२) भारताचे आण्विक धोरण बदललेले आहे.

३) दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी भारत जागतिक संबंध मजबूत करत आहे.

४) भारताचे परराष्ट्र धोरण परिस्थितीनुसार बदलत आहे.

५) भारतीय जागतिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल करीत आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत अभ्यासाच्या तथ्य संकलनासाठी दोन पद्धती वापरण्यात येणार आहेत.

१) प्राथमिक स्त्रोत २) दुय्यम स्त्रोत

**द्वित्तीयक स्त्रोत**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी केवळ द्वित्तीय स्त्रोतांचा वापर केला आहे. यात संदर्भग्रंथ, लेख, विविध वर्तमानपत्रे, अहवाल, संशोधन पत्रिका, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुस्तके, स्मरणिका व इंटरनेट यासारख्या साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

**संशोधनाचा आराखडा**

प्रस्तुत शोधप्रबंधाची एकूण सात प्रकरणात विभागणी केली आहे.

**प्रकरण १ ले – प्रस्तावना**

पहिले प्रकरण प्रस्तावना हे आहे. या प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. पूर्व संशोधन साहित्याचा आढावा, संशोधन पद्धती, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाचा हेतू, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितकृत्ये, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, तथ्य संकलन, संशोधन आराखडा या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण २ रे - भारताचे परराष्ट्र धोरण : उदय, विकास व मूलभूत घटक**

संशोधन विषयाच्या दुसऱ्या प्रकरणात भारत-अमेरिका परराष्ट्र धोरण आहे. यात परराष्ट्र धोरणाचा सविस्तर अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. यात परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे, परराष्ट्र धोरणाची निर्मिती प्रक्रिया त्यात संसद, पंतप्रधान, मंत्रिमंडळ, राष्ट्रीय सुरक्षा परिषद, परराष्ट्र मंत्रालय, गुप्तचर यंत्रणा याची मांडणी करण्यात आली आहे. प्राचीन, मध्ययुगीन व ब्रिटिश काळातील, परराष्ट्र धोरणाचा आढावा यात घेण्यात आला आहे. परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये, परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक, लोकसंख्या, भूप्रदेश, नैसर्गिक साधनसंपत्ती, भाषा, धर्म, वंश, संस्कृती, लोकमत, राजकीय विचारधारा, जागतिक लोकमत, राजकीय नेतृत्व, ऐतिहासिक घटक, लष्करी सामर्थ्य, आंतरराष्ट्रीय संघटना या बाबींची चर्चा करण्यात आली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचा ऊहापोहही या प्रकरणात केला आहे.

**प्रकरण ३ रे – १९९० नंतरचे परराष्ट्र धोरण**

१९९१ साली भारताचा घनिष्ठ मित्र रशियाचे विघटन झाले. त्यामुळे जागतिक राजकारणात फार मोठे बदल झाले. या घटनेचा परिणाम भारत-अमेरिका यांच्या परराष्ट्र धोरणावर व परस्पर संबंधावर पडला. भारताने गॅट करारावर केलेली सही, भारताने जागतिकीकरणाचा केलेला स्वीकार, पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी स्पष्ट केले की, भारत परमाणु करारावर सही करणार नाही. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे व १३ मे १९९८ ला पाच अणुस्फोट केले. याचा फार मोठा धसका अमेरिकेने घेतला. त्यांनी भारतावर आर्थिक निर्बंध लादले. भारताने या निर्बंधाला न डगमगता आपली घोडदौड चालूच ठेवली. त्यामुळे पुढे काही दिवसात अमेरिकेने भारतावरील आर्थिक निर्बंध उठवले. १९९९ मध्ये कारगील युद्ध झाले. त्यात युद्धात अमेरिकेने हस्तक्षेप करण्यास वाजपेयी यांनी स्पष्ट नकार दिला. येथूनच पुढे भारताच्या परराष्ट्र धोरणात परिवर्तन झाले. अमेरिकचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी २१ मार्च ते २५ मार्च २००० मध्ये भारताचा दौरा केला. या भेटीत त्यांनी भारताच्या प्रगतीचा आढावा घेतला. भारताचे राजकीय संबंध सुधारल्याशिवाय इतर कोणत्याही संबंधातून सुधारणा होणार नाही याची जाणीव त्यांना झाली. काश्मीर समस्येसंबंधी अमेरिका मध्यस्थी करणार नाही, भांडवल गुंतवणूकीस दोन्ही देश एकमेकांना मदत करतील या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अलिप्तवादी चळवळ व भारत अमेरिका संबंध या घटकाला यात महत्त्व देण्यात आले आहे.

**प्रकरण ४ थे - भारताचे आण्विक धोरण**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनी आण्विक धोरण ठरवताना युद्ध, शस्त्रास्त्र स्पर्धा, आक्रमण अशा घटकाला विरोध करून शस्त्रास्त्र नियंत्रण, शांतता, आर्थिक विकास, वैज्ञानिक विकास या बाबीला महत्त्व दिले आहे. या धोरणाचा आढावा यात आला आहे. भारत-अमेरिका अणुकरार, या अणुकराराची वैशिष्ट्ये, कलमे, कराराचे स्वरूप, कराराचे फायदे-तोटे, विरोधी पक्षाच्या भूमिका याची चर्चा यात आली आहे.

**प्रकरण ५ वे - भारताचे दहशतवाद विरोधी धोरण**

आज जगाला भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांपैकी दहशतवाद ही एक प्रमुख समस्या आहे. भारतालाही या समस्येने ग्रासले आहे. भारताच्या निर्मितीपासूनच दहशतवादाच्या समस्येने ग्रासले आहे. दहशतवाद हा भारताचे परराष्ट्र धोरण, दहशतवाद व अंतर्गत सुरक्षा व्यवस्था, त्यातूनच मोदी सरकाराचे सर्जिकल स्ट्राईक या बाबींचा यात आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण ६ वे - भारताच्या परराष्ट्र धोरणाचे भवितव्य**

भारत-अमेरिका यांच्या संबंधामुळे भविष्यात काय फायदे होणार आहेत याचा विचार या प्रकरणात करण्यात आला आहे. भारत-अमेरिका आणि दहशतवाद, भारत आणि जागतिक शांतता, युनोचे भारताला कायम सदस्य करण्यात अमेरिकेची भूमिका, मानवी हक्क आणि भारत-अमेरिका संबंध या बाबींचा ऊहापोह या प्रकरणात करण्यात आला आहे.

**प्रकरण ७ वे – निष्कर्ष**

संशोधन विषयाचे शेवटचे प्रकरण हे निष्कर्षवजा असून वरील सहा प्रकरणांतून जे निष्कर्ष हाती येतील त्याची येथे विस्ताराने नोंद करण्यात येईल.

**संदर्भ सूची**


१) अजय उपाध्याय, भारत-अमेरिका संबंध, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००७

२) डॉ.शैलेश देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण, प्रतिभा प्रकाशन, पुणे, मार्च २००७

३) V.P. Datta, Indias Foreigion Policy, Vikas Publishing House Pvt. Ltd. New Delhi – 1987

४) डॉ.बी.सिंह गहलोत, भारतीय विदेशी नीति, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१३

५) आर.एस. यादव, भारत की विदेश नीति, डार्लिंग किंडरस्ले प्रा.लि. दक्षिण आशिया में पियर्सन के लाईन्सेसि, २०१३

७) राम मूर्ति मिना, भारत-अमेरिका संबंध, एडीबी पब्लिशर्स, जयपुर, २०००

८) डॉ.मुकेशकुमार, स्वतंत्र भारत की विदेश नीति, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रा.लि., नई दिल्ली, २०१४

९) पद्म सिंह, भारत की परमाणु नीति और भारत-अमेरिका संबंध, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१४

१०) डॉ.शाम मोहन अग्रवाल, महेंद्र सिंह, आंतरराष्ट्रीय संबंध, आस्था प्रकाशन, जयपुर, २०१०

११) डॉ.शैलेंद्र देवळाणकर, संयुक्त राष्ट्रे, प्रतिभा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २००८

संशोधक
**प्रा.संजय काशिनाथ शेळके**
राज्यशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.नवनाथ गोविंदराव अडकीने**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर
महाविद्यालय, उमरी जि.नांदेड